**L. C. BILL No. VII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानसभेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

१९५८ चा ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहेः—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५३अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५३अ मधील, पोट-कलम (१) ला पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९५८ चा ६०.

"परंतु, जेव्हा कार्यवाही सुरू करण्याची नोटीस, वर नमूद केलेल्या सहा वर्षांच्या कालावधीत काढण्यात आली असेल त्या बाबतीत, उक्त कालावधी समाप्त झाल्याच्या कारणास्तव अशी कार्यवाही व्यपगत होणार नाही आणि अशा कार्यवाहीत मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून अंतिम आदेश पारित करण्यात येईपर्यंत ती सुरू राहील.".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक  क्रमांक ७.]**

**[महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.]

**[विधानपरिषदेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानसभेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई